## L. A. BILL No. LII OF 2011.

## A *BILL*

## FURTHER TO AMEND THE BOMBAY STAMP ACT, 1958.

## सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५२.

**मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक १५ डिसेंबर, २०११ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**ज्याअर्थी**, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

(१९५८ चा मुंबई ६०.) **आणि ज्याअर्थी**, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि,

(२०११ चा महा. अध्या. २२.) म्हणून, त्यांनी दिनांक २८ नोव्हेंबर २०११ रोजी मुंबई मुद्रांक (सुधारणा) अध्यादेश, २०११, हा प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बासष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :–

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या [redacted] मुंबई मुद्रांक (सुधारणा) अधिनियम, ?opt असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २८ नोव्हेंबर २०११ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम २ ची सुधारणा.

२. मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम २ मधील, खंड (के) मध्ये, उप-खंड (चार) नंतर, पुढील उप-खंड जादा दाखल करण्यात येईल :— १९५८ चा मुंबई ६०.

" (पाच) ई-प्रदानाची पावती ; ".

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम १० ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम १० मधील, पोट-कलम (३) मध्ये,—

(क) खंड (३) मध्ये, " किंवा " हा मजकूर वगळण्यात येईल ;

(ख) खंड (४) मध्ये, " प्रदानादेशाद्वारे, " या मजकुराऐवजी, " प्रदानादेशाद्वारे ; किंवा " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) खंड (४) नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येईल :—

" (५) ई-प्रदानाद्वारे, ";

(घ) " मुख्य मुद्रांक कार्यालयात " या मजकुरानंतर, " किंवा, यथास्थिति, शासकीय पावती लेखांकन यंत्रणेत (आभासी कोषागार), " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम ६९ ची सुधारणा.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम ६९ मधील, पोट-कलम (२) मध्ये, खंड (क) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (कअ) ई-प्रदानाद्वारे मुद्रांक शुल्क भरण्याची रीत, आणि त्याचा परतावा ; ".

२०११ चा महा. अध्या. २२.

**५.** (१) मुंबई मुद्रांक (सुधारणा) अध्यादेश, २०११, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

सन २०११ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २२ याचे निरसन व व्यावृत्ती.

(२) असे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, *या अधिनियमाद्वारे* सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.